सत्यमेव जयते

Government of Maharashtra

महाराष्ट्र शासन

# GOVERNMRNT OF MAHARASHTRA

# REGIONAL COMMISSIONER OFFICE, CHH. SAMBHAJI NAGAR

# (BACKWARD CELL)

## Section-B

### Category wise Reserved Seats (100 Points)

| Sr. No | Category | Reserved Percentage | Points in Serial | |
|---|---|---|---|---|
| 1 | Schedule Caste (SC) | 13 % | 1,12,21,27,37,43,51,61,67,73,81,91,97 | |
| 2 | Schedule Tribes (ST) | 7 % | 2,23,33,53,63,71,93 | |
| 3 | Vimukt Jati (V.J -A) | 3 % | 3,41,83 | |
| 4 | Nomadic Tribes (NT-B) | 2.5 % | 4,47 | 99 (B/C) |
| 5 | Nomadic Tribes (NT-C) | 3.5 % | 7,31,57 | |
| 6 | Nomadic Tribes (NT-D) | 2 % | 11,77 | |
| 7 | S.B.C. | 2 % | 15,87 | |
| 8 | O.B.C. | 19 % | 5,9,17,19,25,29,35,39,45,49,55,59,65,69,75,79,85,89,95 | |
| 9 | E.W.S. | 10 % | 8,16,26,38,46,56,68,76,86,98 | |
| 10 | Unreserved (UR) | 38 % | 6,10,13,14,18,20,22,24,28,30,32,34,36,40,42,44,48,50,52,54, 58,60,62,64,66,70,72,74,78,80,82,84,88,90,92,94,96,100 | |

Principal

Sambhaji College (Arts & Commerce)

Murud,Tq.& Dist.Latur(M.S.) 413510

# परिशिष्ट–ब
## प्रवर्गनिहाय आरक्षित बिंदु

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रवर्ग</th><th>आरक्षणाची टक्केवारी</th><th colspan="2">बिंदु क्रमांक</th></tr>
<tr><td>१</td><td>अनुसूचित जाती</td><td>१३%</td><td colspan="2">१,१२,२१,२७,३७,४३,५१,६१,६७,७३,८१,९१,९७</td></tr>
<tr><td>२</td><td>अनुसूचित जमाती</td><td>७%</td><td colspan="2">२,२३,३३,५३,६३,७१,९३</td></tr>
<tr><td>३</td><td>विमुक्त जाती (अ)</td><td>३%</td><td colspan="2">३,४१,८३</td></tr>
<tr><td>४</td><td>भटक्या जमाती (ब)</td><td>२.५%</td><td>४,४७</td><td rowspan="2">९९(ब/क)</td></tr>
<tr><td>५</td><td>भटक्या जमाती (क)</td><td>३.५%</td><td>७,३१,५७</td></tr>
<tr><td>६</td><td>भटक्या जमाती (ड)</td><td>२%</td><td colspan="2">११,७७</td></tr>
<tr><td>७</td><td>विशेष मागास प्रवर्ग</td><td>२%</td><td colspan="2">१५,८७</td></tr>
<tr><td>८</td><td>इतर मागास प्रवर्ग</td><td>१९%</td><td colspan="2">५,९,१७,१९,२५,२९,३५,३९,४५,४९,५५,५९,६५, ६९,७५,७९,८५,८९,९५</td></tr>
<tr><td>९</td><td>आर्थिकदृष्टया दुर्बल घटक</td><td>१०%</td><td colspan="2">८,१६,२६,३८,४६,५६,६८,७६,८६,९८</td></tr>
<tr><td>१०</td><td>अराखीव</td><td>३८%</td><td colspan="2">६,१०,१३,१४,१८,२०,२२,२४,२८,३०,३२,३४,३६,४०,४२ ४४,४८,५०,५२,५४,५८,६०,६२,६४,६६,७०,७२,७४,७८, ८०,८२,८४,८८,९०,९२,९४,९६,१००.</td></tr>
</table>

Sambhaji College (Arts & Commerce) MURUD Tq. & Dist. Latur (M.S.)

Principal
Sambhaji College (Arts & Commerce)
Murud,Tq.& Dist.Latur(M.S.) 413510

महाराष्ट्र शासन
विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
(मागासवर्ग कक्ष)
3 रा मजला, विभागीय आयुक्त कार्यालय, दिल्ली गेटजवळ, छत्रपती संभाजीनगर -४३१००१
दुरध्वनी: ०२४०-२३५२३५०     ई-मेल: bccellabad@gmail.com

जा.क्र.२०२३/मावक/क्र.-०१/सीआर-२८८     दिनांक :-२१.११.२०२३.

प्रति,
सहसंचालक (उच्चशिक्षण),
नांदेड विभाग नांदेड.

विषय:-प्राचार्य पदाची बिंदुनामावली नोंदवही तपासणीबाबत.
**समाज जागृती शिक्षण संस्था, मुरुड ता.जि. लातुर व्दारा संचलित संभाजी कला, वाणिज्य महाविद्यालय, मुरुड ता. जि. लातुर.**

संदर्भ:- १. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०९/प्र.क्र.२९१/९/१६-बदि.०५.११.२००९.
२. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग अधिसूचना दिनांक ०७ एप्रिल,२०२२.
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण-२२०५/प्र.क्र.९८/विशि-१ दिनांक १३.०९.२०२२.
४. सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांचे पत्र क्र. सहसं/उशि/औवि/अनुदान-१-४/२०२२/२०९६, दिनांक २९.०७.२०२२
५. कुलसचिव (विशेष कक्ष), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे पत्र क्र. विशेष कक्ष/२०२३-२४/१९७०-७१, दिनांक ०२.११.२०२३.

२ उपरोक्त विषयी संदर्भ क्र. ५ वरील पत्रान्वये कुलसचिव (विशेष कक्ष), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी समाज जागृती शिक्षण संस्था, मुरुड ता.जि. लातुर व्दारा संचलित संभाजी कला, वाणिज्य महाविद्यालय, मुरुड ता. जि. लातुर या महाविद्यालयाच्या प्राचार्य (१००% सरळसेवा) व शिक्षक संवर्गातील पदांची बिंदुनामावली नोदवहीची प्राथमिक तपासणी करुन देणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

३. तथापि, संदर्भ क्र. ०४ वरील सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांचे पत्र दिनांक २९.०७.२०२२ नुसार रिक्त् पदापैकी प्रत्यक्षात भरावयाच्या पदांचे आरक्षण निश्चित करुन देण्याबाबतच्या सुचना असल्याने उक्त संस्थेच्या महाविद्याने त्या प्रमाणे रिक्त पदापैकी प्रत्यक्षात भरावयाची पदांची माहिती सादर केलेली नसल्याने तुर्त प्राचार्य पदाचे आरक्षण काढुन देण्यात येत आहे.

४. **विद्यापीठाने सादर केलेल्या प्रस्तावाची खालील प्रमाणे तपासणी करण्यात आली आहे.**

१. कुलसचिव (विशेष कक्ष), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे पत्र दिनांक ०२.११.२०२३ नुसार संस्थेस आज रोजी प्राचार्य संवर्गात ०१ पद मंजुर असून ०० पद कार्यरत व ०१ पद रिक्त आहेत.

५. त्यानुसार कुलसचिव (विशेष कक्ष), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी उक्त संदर्भीय पत्रान्वये समाज **जागृती शिक्षण संस्था, मुरुड ता.जि. लातुर** या संस्थेच्या वरील महाविद्यालयास प्राचार्य पदाची मंजूर पदे ०१ असून त्यापैकी ०० पदे भरलेली असून ०१ पद रिक्त आहेत. कुलसचिव (विशेष कक्ष), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी प्राचार्य पदाचे आरक्षण निश्चित करुन अंतीम तपासणीसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

६. यापूर्वी सहाय्यक आयुक्त मावक यांचेकडुन दिनांक १३.०५.२०१९ रोजी प्राचार्य पदांची बिंदुनामावली नोंदवही तपासणी व प्रमाणित करुन देण्यात आली होती. त्यामध्ये प्राचार्य पद रिक्त होते व सद्यस्थितीतही सदरील रिक्त आहे. शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय दिनांक २१.०९.१९९८ नुसार एकाकी पदास आरक्षण लागु नाही. असे नमूद करुन प्राचार्य मंजूर ०१ पदाची बिंदुनामावली नोंदवही तपासणी व प्रमाणित करुन देण्यात आलेली होती.



Principal
Sambhaji College (Arts & Commerce)

७. **विद्यापीठाने सादर केलेल्या प्रस्तावाची खालील प्रमाणे तपासणी करण्यात आली आहे.**

१. कुलसचिव (विशेष कक्ष), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे पत्र दिनांक ०२.११.२०२३ नुसार संस्थेस आज रोजी प्राचार्य संवर्गात ०१ पद मंजुर असून ०० पद कार्यरत व ०१ पद रिक्त आहेत. सदर संवर्गात ०१ पद मंजूर असल्याने शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय दिनांक २१.०९.१९९८ नुसार, महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती ( विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम,२००१ (२००४) मधील कलम ३(१) (घ) तरतूदीनुसार व सामान्य प्रशासन, शासन निर्णय दिनांक २५.०२.२०२२ नुसार एकाकी पदास आरक्षण लागू होत नाही.

८. प्रकरणी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०२१/ प्र.क्र. ३८७/१६ - ब (ए), दिनांक ०६/०७/२०२१ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील पिटीशन क्रं .३१२३ / २०२० मध्ये दि. ०५/०५/२०२१ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरून राज्याच्या लोकसेवां मधील शासकीय / निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीसाठी दिनांक ०४/०७/२०१९ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेली बिंदुनामावली सुधारीत करुन मा. सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षणास स्थगिती दिल्याच्या दिनांका पासुन म्हणजेच दि. ०९/०७/२०२० पासुन शासकीय / निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदु नामावली विहीत करण्यात आली आहे.

९. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०२१ / प्र.क्र.८३५/१६-ब, दिनांक २५.०२.२०२२ अन्वये बिगर आदिवासी व आदिवासी बहुल जिल्हया करीता छोटया संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

१०. उक्त संदर्भ क्र.०१ वरील शासन परिपत्रक दिनांक ०५.११.२००९ अन्वये राज्यातील वर्ग १ व ४ कर्मचाऱ्यांच्या बिंदुनामावल्या प्रमाणित करण्यासाठी सदरील परिपत्रकाच्या सोबतच्या प्रपत्र - अ मध्ये नमूद केल्या प्रमाणे सक्षम प्राधिकारी यांचेकडून बिंदूनामावली प्राथमिक व अंतीम तपासणी करुन देण्याबाबत निर्देश दिलेलेआहेत. तसेच परिपत्रका मधील नमुद केलेल्या प्राधिकाऱ्या शिवाय इतर अधिकाऱ्यांनी प्रमाणित केले असल्यास सदरील कार्यवाही नियमबाहय ठरते व अशा नियमबाहय कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी जबाबदार राहील असे सदरील परिपत्रकात नमूद केलेले आहे. प्रपत्र -अ वरील अनुक्रमांक ०१ वर संबंधीत कार्यालय-विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालय (वर्ग-१ तेवर्ग-४ संवर्ग) बाबत प्राथमिकत पासणी विद्यापीठ (मावक) यांनी व अंतीम तपासणी सहाय्यक आयुक्त (मावक) प्राधिकारी नमूद केलेले आहे. अनुक्रमांक ८ वर राज्यस्तरीय शैक्षणिक संस्था / राज्यस्तरीय कार्यालयातील आस्थापना यांचेबाबत प्राथमिक तपासणी ही संस्थेचे मुख्य कार्यालय ज्या महसूली विभागामध्ये असेल त्यांचे सहाय्यक आयुक्त (मावक) हे करतील तसेच अंतीम तपासणी प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मावक) हे करतील असे निर्देश दिलेले आहेत.याच अनुषंगाने शासन निर्णय दिनांक ०५.०३.२०१६ मध्ये नमूद केल्यानुसार राज्यस्तरीय शैक्षणिक संस्थामधील गट क व गट ड संवर्गातील सरळसेवा कोटयातील पदाची बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणीचे अधिकार संबधीत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नांदेड यांना व अंतीम तपासणी सहाय्यकआयुक्त (मावक) यांनी करावी अशी तरतूद आहे.

११. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णयक्रं. संकीर्ण२०१२/प्र.क्र.९४/१९/ विशि-१,दि. ११.०४.२०२२ व शासन अधिसुचना दिनांक ०७.०४.२०२२ नुसार विहीत केलेल्या तरतुदी नुसार प्रत्येक विदयापीठातील तसेच एकाच व्यवस्थापनेच्या नियंत्रणाखालील सर्व महाविदयालयांतील अध्यापक संवर्गातील ( समानवेतनश्रेणीतील ) सर्व विषयांतील मंजुर पदे एकत्रित करण्यात यावी अश्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्रजा.क्र. संकिर्ण -२२०५ / प्र.क्र.९८ विशी-१ दि. २४.०६.२०२२ नुसार ग्रंथपाल व शारीरीक शिक्षण संचालक हि पदे शिक्षक संवर्गातील असल्याने सदर पदांची बिंदुनामावली वेतनश्रेणी विचारात घेऊन सहा. प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / प्राध्यापक या संवर्गाच्या बिंदुनामावलीत एकत्रीत दर्शविणे आवश्यकअसल्याचे कळविलेआहे.

१२. उक्त संदर्भ क्र.०३ वरील पत्र दिनांक १३.०९.२०२२ अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम,२०१६ मधील कलम २ (६१) येथे **"अध्यापक"** याचा अर्थ स्पष्ट करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर तरतुदीत प्राचार्य पदाचा अध्यांपकाच्या व्याख्येतसमावेशआहे. त्या मुळे एखाद्या संस्थेची एकापेक्षा अधिक महाविद्यालये असतील तर अशा संस्थेतील प्राचार्य पद समान वेतन श्रेणीतील असल्याने प्राचार्य पदास महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ मधील संवर्ग निहाय आरक्षणाच्या तरतुदी लागू होतील व सदर तरतुदीनुसार कार्यवाही करणे आवश्यकआहे.असे नमूद केले आहे.

१३. विषयांकीत कार्यालयाच्या / संस्थेच्या खालील पदांसाठी बिंदु नामावली, शासन निर्णय दिनांक ०६.०७.२०२१, २५.०२.२०२२, ११.०४.२०२२, शासन पत्र दिनांक २२.०८.२०१७, शासन अधिसुचना दि. ०७.०४.२०२२ नुसार **समाज जागृती**



Principal
Sambhaji College (Arts & Commerce)
Murud Tq.& Dist.Latur(M.S.) 4135

शिक्षण संस्था, मुरुड ता.जि. लातुर उपलब्ध करुन दिलेल्या कागद पत्रावरून व कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यपीठ, नांदेड यांनी केलेल्या प्राथमिक तपासणीस अनुसरून खालील प्रमाणे बिंदु नामावली नोंदवही तपासणी करण्यात येत आहे.

**०१) पदाचे नाव: प्राचार्य (१००% सरळसेवा)**

**एकुण मंजूर पद - ०१** **कार्यरत पद - निरंक** **रिक्त पद - ०१**

सदर संवर्गात ०१ पद मंजूर असल्याने शासन सा.प्र. वि निर्णय क्र. बीसीसी-१०९७/प्रक्र.२०/९७/१६-ब, दिनांक २१/०९/१९९८ नुसार व आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ३(१) (घ) तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०२१/प्र.क्र.८३५/१६-ब, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ नुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही.

खालील नमुद अटींचे अधीन राहून **समाज जागृती शिक्षण संस्था, मुरुड ता.जि. लातुर व्दारा संचलित संभाजी कला, वाणिज्य महाविद्यालय, मुरुड ता. जि. लातुर** या महाविद्यालयाच्या प्राचार्य, संवर्गाची बिंदुनामावली नोंदवही तपासणी करुन देण्यात येत आहे.

## अटी

१. सदर बिंदुनामावली नोंदवही कुलसचिव (विशेष कक्ष), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे पत्र क्र. विशेष कक्ष/२०२३-२४/१९७०-७१, दिनांक ०२.११.२०२३ रोजीचे पत्रास अधिन राहुन प्रमाणित करण्यात येत आहे. बिंदुनामावली नोंदवहीबाबत काही न्यायालयीन तक्रार उद्भवल्यास संबंधित नियुक्ती प्राधिकारी व कुलसचिव (विशेष कक्ष), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड जबाबदार राहतील.

२. नियुक्ती प्राधिकारी व नियुक्ती प्राधिकारी व कुलसचिव (विशेष कक्ष), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी सादर केलेले कागदपत्र व पुरविलेल्या माहितीच्या आधारे बिंदु नामावली नोदवहीची तपासणी करण्यात आलेली आहे. सदर माहिती चुकीची असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित नियुक्ती प्राधिकारी व कुलसचिव (विशेष कक्ष), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड जबाबदार राहतील.

३. मागासवर्गीयांच्या भरती बाबतचे मंत्रालय/ प्रशासकीय विभाग/संचालक, समाज कल्याण पुणे यांना वार्षिक विवरणपत्र सादर करण्याची जाबदारी नियुक्ती प्राधिकारी व कुलसचिव (विशेष कक्ष), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांची राहील.

४. उपसचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.२०० A/१६-ब दिनांक १९.०४.२०१८ नुसार खालील परिस्थितीत बिंदु नामावली नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक राहील.

अ) मागासवर्ग कक्षाकडुन बिंदुनामावली पडताळणी झाल्यानंतर तीन वर्षानंतर किंवा दरम्यानच्या कालावधीत मंजुर पदसंख्येत वाढ / घट झाल्यास पदभरतीच्या वेळी अथवा सेवाप्रवेश नियमात बदल झाल्यास विहीत मुदतीपुर्वी बिंदु नामावली नोंदवहीची तपासणी करुन घ्यावी.

ब) प्रत्येक वर्षी जर कार्यरत पदसंख्येमध्ये बदल होत असेल म्हणजेच रिक्त पदसंख्या बदलत असेल अशा वेळी दरवर्षी बिंदुनामावली तपासुन आरक्षण निश्चीती करणे आवश्यक राहील.

क) पदभरतीच्या वेळी बिंदुनामावली नोंदवही तपासणी व प्रमाणिकरण करणे आवश्यक राहील.

ड) आरक्षणाची योग्य रितीने अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने ज्यावेळी कार्यरत पदसंख्या बदलत असेल अशावेळी म्हणजेच दरवर्षी बिंदुनामावली तपासणे आवश्यक राहील.

Bonyo 22/11/2023

इ) ज्यावेळी मंजुर पदसंख्या, कार्यरत पदसंख्या व रिक्त पदसंख्या यामध्ये कोणताही बदल होत नसेल अशावेळी दरवर्षी रोस्टर न तपासता दर तीन वर्षांनी रोस्टर तपासणे उचित होईल.

ई) वरील परिस्थीतीत वेळचे वेळी बिंदु नामावली नोंदवहीची तपासणी करुन घेण्याची जबाबदारी नियुक्ती प्राधिकारी व नियुक्ती प्राधिकारी व कुलसचिव (विशेष कक्ष), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांची राहील.

**१४. बिंदु नामावली मध्ये कर्मचारी यांची नोंद घेण्याबाबत खालील प्रमाणे दक्षता घेण्यात यावी.**

a) संवर्गातील जी रिक्त पदे प्रत्यक्ष सरळसेवा प्रवेशाव्दारे भरण्यात येतील तेवढेच पद नामावलीत नोंदविण्यात यावीत.

b) बिंदुनामावली मधील प्रत्येक नोंद ही रोखवही (Cash book) प्रमाणे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

c) प्रत्यक्ष संवर्गासाठी संवर्गनिहाय वेगवेगळी बिंदु नामावली ठेवण्यात यावी.

d) पदोन्नतीसाठी संवर्ग निहाय बिंदु नामावली वेगवेगळी ठेवण्यात यावी.

e) बिंदु नामावली ही पृष्ठांकन करुन व प्रमाणित करुन त्यावर कार्यालयाची / संस्थेची मोहोर लावण्यात यावी.

f) बिंदु नामावलीत बिंदु ज्या कारणास्तव रिक्त झाला. त्याची नोंद शेरा रकान्यात घेवुन तसे नियुक्ती प्राधिकारी यांची स्वाक्षरी घ्यावी व तसेच ज्या कारणास्तव बिंदुवर नोंद घेण्यात आलेली आहे. त्याचे कारण शेरा रकान्यात नोंदविण्यात यावे.

g) ज्या मागासवर्गीय उमेदवारांची सरळसेवेने निवड गुणवत्तेवर झालेली आहे. त्यांची नोंद बिंदुनामावलीमध्ये खुल्या /अराखीव बिंदुवर घेण्यात यावी.

Principal
Sambhaji College (Arts & Commerce)
Murud,Tq.& Dist.Latur(M.S.) 413510

h) बिंदुनामावलीत बिंदुची नोंद घेताना सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक ०६.०७.२०२१ मधील परिशिष्ट -अ सरळसेवा यातील बिंदुप्रमाणे नोंद घ्यावी.

i) छोटया संवर्गाचे आरक्षण निश्चित करताना सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २५.०२.२०२२ प्रमाणे बिंदुनामावली तयार करुन त्या प्रवर्गाच्या बिंदुप्रमाणे बिंदुनामावलीमध्ये नोंद घेण्यात यावी.

j) बिंदु नामावली ही मागास प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी आहे. जेष्ठता निश्चित करण्यासाठी नाही, याची नोंद घ्यावी.

k) सहाय्यक आयुक्त (मावक) यांच्याकडून बिंदुनामावली प्रमाणित करुन दिल्यानंतर त्यात खाडाखोड करु नये.

l) सहाय्यक आयुक्त (मावक) यांनी बिंदुनामावली प्रमाणित केल्यानंतर अधिनियम, २००१ च्या कलम (९) प्रमाणे काही बिंदुच्या नोंदीमध्ये बदल करावयाचा असल्यास त्यास शासनाची मान्यता घेऊनच बदल करण्यात यावा.

वरील प्रमाणे अटी व शर्ती नुसार **समाज जागृती शिक्षण संस्था, मुरुड ता.जि. लातुर** या संस्थेची बिंदुनामावली तपासणी व प्रमाणिकरण करुन देण्यात येत आहे. उपरोक्त प्रमाणिकरणानुसार अनुशेष भरण्याची अटी व शर्तीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

दिनांक :- २१.११.२०२३

आर.एन.कोठेकर (अ.का.)

एस.पी.गायकवाड,
ना.तह (मावक)

22/11/2023
(डॉ. भारत कदम)
सहाय्यक आयुक्त (मावक)
विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर

**प्रत:-माहितीवआवश्यककार्यवाहीसाठी.**

१) मा. सचिव, (सा.वि.स) व विशेष चौकशी अधिकारी-२, सामान्य प्रशासन विभाग, (१६-ब) मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव

२) कुलसचिव (विशेष कक्ष), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

३) अध्यक्ष/ सचिव, **समाज जागृती शिक्षण संस्था, मुरुड ता.जि. लातुर**

Principal
Sambhaji College (Arts & Commerce)
Murud,Tq.& Dist.Latur(M.S.) 413510

विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर
मागास वर्ग कक्ष

कुलसचिव (विशेष कक्ष), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी सादर केलेल्या समाज जागृती शिक्षण संस्था, मुरुड ता.जि. लातुर व्दारा संचलित संभाजी कला, वाणिज्य महाविद्यालय, मुरुड ता. जि. लातुर या महाविद्यालयाच्या प्राचार्य (सरळसेवा १००%) संवर्गातील पदांची बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी करण्यात आली असून तपासणी अहवाल या कार्यालयाचे पत्र क्र.२०२३/मावक/कक्ष-०१/सिआर-२८८, दिनांक २१.११.२०२३ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे.

दिनांक :- २१.११.२०२३

आर.एन.कोठेकर (अ.का.)

एस.पी.गायकवाड,
ना.तह (मावक)

22/11/2023
(डॉ. भारत कदम)
सहाय्यक आयुक्त (मावक)
विभागीय आयुक्त कार्यालय
छत्रपती संभाजीनगर

०१) पदाचे नाव: प्राचार्य (१००% सरळसेवा)

एकुण मंजूर पद - ०१ कार्यरत पद - निरंक रिक्त पद - ०१

सदर संवर्गात ०१ पद मंजूर असल्याने शासन सा.प्र. वि निर्णय क्र. बीसीसी-१०९७/प्रक्र.२०/९७/१६-ब, दिनांक २१/०९/१९९८ नुसार व आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ३(१) (घ) तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०२१/प्र.क्र.८३५/१६-ब, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ नुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही.

22/11/2023
(डॉ. भारत कदम)
सहाय्यक आयुक्त (मावक)
विभागीय आयुक्त कार्यालय
छत्रपती संभाजीनगर

Principal
Sambhaji College (Arts & Commerce)
Murud, Tq.& Dist.Latur(M.S.) 413510